महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल,
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दि. १३ मार्च, २०२०

# अधिसुचना

**क्रमांक करोना २०२०/प्र क्र ५८/ आरोग्य ५ : ज्याअर्थी,** राज्यात करोना विषाणुमुळे (COVID-19) उदभवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे.

**त्याअर्थी,** जागतिक आरोग्य संघटना व आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रसारित केलेल्या विविध उपाययोजनांची अंमलबजावणी व राज्यात या करोना विषाणुमुळे उदभवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**त्याअर्थी,** साथरोग अधिनियम, १८९७ च्या खंड २ नुसार राज्याला मिळालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्र राज्यात साथरोग अधिनियमातील खंड २, ३, व ४, ची अंमलबजावणी या अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरु करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

(डॉ. प्रदीप व्यास)
शासनाचे प्रधान सचिव

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण) मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी